स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतंर्गत अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक विकासातील योगदान – विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा

(2019 ते 2024)

संशोधक

कैलास मारोती वाघमारे

(एम. ए, बी. एड)

मार्गदर्शक

डॉ. व्ही. जी. कंधारे

धुंडा महाराज महाविद्यालय, देगलूर

जुन 2025

कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक विकासातील योगदान – विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा (2019 ते 2024)

प्रस्तावना

भारत एक कृषिप्रधान देश असून ग्रामीण भागात देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ६५ टक्के लोकसंख्या वास्तव्यास आहे. या ग्रामीण भागात शेती आणि शेतमजुरी हे प्रमुख उपजीविकेचे साधन मानले जाते. पारंपरिक भारतीय समाजरचनेत स्त्रीला 'कुटुंबाचा आधारस्तंभ' मानले गेले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची भूमिका ही केवळ घरातील जबाबदाऱ्या पार पाडणारी गृहीणी म्हणून मर्यादित राहिलेली नसून, त्या शेतीच्या उत्पादन प्रक्रियेतही सक्रिय भाग घेतात. अशा महिला ज्या एकाच वेळी कुटुंबाची जबाबदारी, शेतीतील कामे आणि शेतमजुरी करत असतात, त्यांचे योगदान कौटुंबिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत व्यापक आणि मूलभूत आहे. भारतातील ग्रामीण जीवनशैलीचा आधार शेती असून ती केवळ एक आर्थिक क्रिया नसून, जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग आहे. कृषी क्षेत्रातील उत्पादक शक्ती म्हणून पुरुषांचे योगदान स्पष्टपणे अधोरेखित होते; परंतु महिलांचे योगदान अदृश्य राहते. विशेषतः शेतकरी व शेतमजूर महिलांचे कष्ट, त्यांचे विविध स्तरांवरचे योगदान, आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांची व्याप्ती या गोष्टी समाजाच्या मुख्य प्रवाहात पुरेशा प्रमाणात चर्चेत येत नाहीत.

कौटुंबिक विकास म्हणजे केवळ आर्थिक उत्पन्नवाढ नव्हे तर आरोग्य, शिक्षण, सामाजिक सक्षमीकरण, कुटुंबातील समतोल निर्णयप्रक्रिया, संस्कारपरंपरा, जीवनशैली यांचा समन्वय होय. ग्रामीण महिलांचा या सर्व घटकांवरील प्रभाव स्पष्ट असूनही, त्यांचे कार्य आणि योगदान फारसे लेखांकित झालेले नाही. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर महिलांचे जीवन हे दुहेरी जबाबदाऱ्यांनी भारलेले असते. त्या एका बाजूला शेतीमध्ये सक्रीय सहभाग घेतात, तर दुसऱ्या बाजूला कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलतात. त्यांनी सकाळपासून रात्रीपर्यंत कष्टाची साखळी चालू ठेवलेली असते. हे सर्व करत असताना त्या आपल्या कुटुंबाच्या आर्थिक, सामाजिक आणि मानसिक विकासात महत्त्वाचे योगदान देतात. कौटुंबिक विकास म्हणजे केवळ आर्थिक उत्पन्नात वाढ नव्हे, तर त्यात आरोग्यदायी जीवनशैली, शिक्षण, सुरक्षित निवास, सामाजिक प्रतिष्ठा, आत्मनिर्भरता आणि निर्णय घेण्याची क्षमता यांचा समावेश होतो. शेतकरी व शेतमजूर महिलांचे कार्य हे केवळ उपजिविकेसाठी नसते तर त्यांच्या श्रमातून कुटुंबाचा सर्वांगीण विकास साधला जातो. कौटुंबिक विकासाच्या आर्थिक संकल्पनेत उत्पन्न वाढ, बचत, गुंतवणूक, उपभोग पातळी, आरोग्य व शिक्षण यांसारखे घटक महत्त्वाचे मानले जातात. महिलांच्या प्रयत्नांमुळे घरातील अन्नसुरक्षा टिकून राहते, बचतीस चालना मिळते, आणि अनेकदा त्यांच्या कृतीमुळे कुटुंब आर्थिक संकटातून वाचते. त्या स्थानिक बचत गटांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सूक्ष्म वित्त व्यवहार करतात. अशा महिला स्वतः उत्पन्न मिळवत नसल्या तरी त्या कुटुंबाच्या आर्थिक निर्णयप्रक्रियेतील अपरिहार्य घटक असतात.

कौटुंबिक विकासात महिलांच्या भूमिकेचा विचार करताना सामाजिक मूल्यव्यवस्था, परंपरा, रूढी, लिंगभेद, स्त्रियांची आर्थिक परावलंबित्वाची स्थिती, आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमधील त्यांचा सहभाग या बाबींचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. महिलांच्या सक्षमीकरणाचा पाया हा त्यांच्या कौटुंबिक योगदानाच्या योग्य मूल्यमापनात आहे. शेतकरी व शेतमजूर महिलांचे कार्य हे केवळ उपजिविकेसाठी नसते तर त्यांच्या श्रमातून कुटुंबाचा

सर्वांगीण विकास साधला जातो. ग्रामीण भारतातील शेतकरी व शेतमजूर महिलांचा कौटुंबिक विकासातील सहभाग हा केवळ सामाजिक वा सांस्कृतिक पातळीपुरता मर्यादित नसून, तो अर्थिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आणि परिणामकारक आहे. त्या घरातील आर्थिक निर्णय, शेतीतील प्रत्यक्ष सहभाग, मजुरी, बचत गटातील सहभाग, मुलांचे संगोपन, आरोग्य व्यवस्थापन, अन्नसुरक्षा अशा अनेक घटकांमधून कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीस चालना देतात.

संशोधनाचे उद्देश

1. कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांच्या सामाजिक आर्थिक व कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

2. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे विश्लेषण करणे.

3. कौटुंबिक जबाबदाऱ्या संभाळणाऱ्या महिलांचे कौटुंबिक विकासातील (शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती, सामाजिक सहभाग) योगदानाचे विश्लेषण करणे.

4. कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतमजरी व शेतमजूर महिलांच्या योगदानामुळे त्यांच्या कुटुंबाच्या सर्वांगीण (आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक) विकासावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे.

5. शेतकरी व शेतमजूर महिलांसाठी असलेल्या शासकीय योजना व सुविधाचा अभ्यास करणे.

संशोधनाचे गृहीतके

1. शेतकरी व शेतमजूर महिलांची सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक स्थिती तुलनात्मकदृष्ट्या मागासलेली आहे.

2. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजूर महिलांवर कौटुंबिक जबाबदाऱ्या अधिक असल्याने कौटुंबिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

3. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या शेतकरी व शेतमजूर महिला त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात.

4. महिलांच्या विविध प्रकारच्या योगदानामुळे कुटुंबाच्या सर्वांगीण (आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक) प्रगतीत सकारात्मक बदल दिसून येतो.

5. शेतकरी व शेतमजूर महिलांना उपलब्ध असलेल्या शासकीय योजना व सुविधा माहितीच्या अभावामुळे किंवा अंमलबजावणीतील त्रुटींमुळे प्रभावीपणे पोहोचत नाहीत.

संशोधन आराखडा (संशोधन पद्धती)

प्रस्तुत संशोधनासाठी विविध संशोधन पद्धती पैकी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनाची रचना क्षेत्राधिष्ठित (field-based) असून, प्रत्यक्ष अनुभव, निरीक्षण आणि माहिती संकलन यावर आधारित आहे. त्यामुळे महिलांचा कृषी उत्पादन व्यवस्थेतील भूमिका व त्यांच्या कार्याचे अचूक आर्थिक मूल्यांकन करण्यात येते.

नमुना निवड

कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांची कौटुंबिक विकासातील

योगदान विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा याविषयी संशोधन करताना नांदेड जिल्ह्यातील सर्व सोहळा तालुके नांदेड, मुदखेड, किनवट, माहूर, हदगाव, हिमायतनगर, भोकर, अर्धापूर, धर्माबाद, नायगाव, देगलूर, बिलोली, मुखेड, कंधार, लोहा, अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष संशोधनासाठी गावाची व महिलांची निवड करताना गैर-सभाव्यता नमुना निवड (Non probability) पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे त्यात सहेतुक नमुना निवड पद्धती अवलंब केला जाणार आहे.

गावाची निवड

सदरील संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे अभ्यास क्षेत्र आहे. संशोधनासाठी नांदेड, मुदखेड, किनवट, माहूर, हदगाव, हिमायतनगर, भोकर, अर्धापूर, धर्माबाद, नायगाव, देगलूर, बिलोली, मुखेड, कंधार, लोहा, या तालुक्यातून प्रत्येकी 5 गावे एकूण ८० गावाची सहेतुक नमुना निवड पद्धतीने संशोधनासाठी निवड करण्यात येणार आहे.

महिलांची निवड

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यामधून निवडलेल्या ८० गावातून प्रत्येक गावातून ५ कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांची सहेतुक नमुना पद्धत निवड केली जाणार आहे. निवड करताना वय, शिक्षण, कृषी उत्पादन व्यवस्थेतील सहभाग, जातीचा प्रकार, जमीनधारणा, कुटुंबाचा आकार व सामाजिक स्थिती या घटकांचा विचार करण्यात येणार आहे.

माहिती संकलनाचे स्त्रोत व साधने

संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक विकासातील योगदानाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती संकलित करण्यात येईल. माहिती संकलनासाठी विविध तंत्रांचा व साधनांचा वापर करण्यात येणार आहे

प्राथमिक माहिती

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती अनुसूची, फोकस ग्रुप चर्चा व सहभागी निरीक्षण यांचा वापर करण्यात येणार आहे. यामधून कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमुजर महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, कौटुंबिक विकासातील योगदान, कौटुंबिक विकासातील योगदानामुळे झालेला परिणाम व कौटुंबिक जबाबदारी असणाऱ्या शेतमजूर व शेतकरी महिलांच्या शासकीय योजना यासंबंधी माहिती संकलित करण्यात येणार आहे.

दुय्यम माहिती

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्वरूपाची माहिती शासकीय अहवाल, कृषि विभागाचे आकडे, जिल्हा सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण अहवाल, नाबार्ड व इतर संशोधन संस्थांचे प्रकाशित अहवाल, शैक्षणिक ग्रंथ, मासिके, संशोधन प्रबंध, तज्ञाची मते,लेख, इंटरनेट इत्यादींचा माध्यमातून दुय्यम माहिती संकलित करण्यात येणार आहे.

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक विकासातील योगदानाचा अभ्यास करताना संकलित केलेली माहिती विस्तृत व विखुरलेली असल्याने

प्राथमिक व दुय्यम माहितीचे विश्लेषण सांख्यिकीय (quantitative) तसेच गुणात्मक (qualitative) पद्धतीने करण्यात येईल. माहिती विश्लेषणाच्या प्रक्रियेमध्ये माहितीचे वर्गीकरण, सांकेतीकरण, सांख्यिकीय विश्लेषण त्यामध्ये सारणीय, आलेख, सहसंबंध, शेकडा बदल, प्रतिशत प्रमाण अशा साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी

नांदेड कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांची कौटुंबिक विकासातील योगदान याविषयी अभ्यास याविषयी संशोधनकरण्यासाठी 2019 ते 2024 असा कालखंड निवडण्यात आलेला आहे

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक जीवन हे केवळ घरगुती कामांपुरते मर्यादित राहत नाही, तर त्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरही महत्त्वाची भूमिका बजावतात. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात महिलांचा कृषी आणि कुटुंबव्यवस्थेतील सहभाग हा अत्यंत व्यापक आहे. त्या शेतीच्या सर्व टप्प्यांमध्ये सक्रीय असतात—पेरणीपासून ते कापणीपर्यंत आणि बाजारात विक्रीपर्यंत. त्याचबरोबर त्या घरातील आर्थिक नियोजन, मूलभूत गरजांची पूर्तता, मुलांचे शिक्षण, आरोग्य, निर्णय प्रक्रिया व उत्पन्नाचा स्त्रोत या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतात.

प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक विकासात असलेल्या योगदानाचा सखोल अभ्यास केला जाईल. शेती, घरगुती जबाबदाऱ्या, उत्पन्नवाढीतील सहभाग, व कौटुंबिक निर्णय प्रक्रियेमधील त्यांची भूमिका यांचा समावेश राहील. महिलांना भेडसावणाऱ्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अडचणींचा विचार करून, त्यावर उपाय सुचवणे या घटकाबाबत विश्लेषण करण्यात येणार आहे. प्रस्तुत अभ्यासाच्या मर्यादा नांदेड जिल्ह्याच्या भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक चौकटीपुरत्या मर्यादित आहेत. उपलब्ध माहिती, महिलांची मोकळेपणाने मत मांडण्याची तयारी, महिलांचे अज्ञान, सामाजिक दबाव, संकोच, वेळेची मर्यादा, अनेक महिलांच्या कार्याच्या नोंदी नसणे, अनौपचारिक कामाचे स्वरूप, आणि योग्य व अचूक माहितीचा अभाव यामुळे संकलित माहितीची व्याप्ती मर्यादित राहू शकते. तसेच, महिलांच्या योगदानाचे अनेक पैलू अप्रत्यक्ष किंवा अव्यक्त स्वरूपाचे असल्याने त्यांच्या मोलाचे अचूक मोजमाप करणे ही एक मर्यादा ठरू शकते. संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्ह्यातील केवळ कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक विकासातील योगदान याविषयी आहे तसेच संशोधनाचा कालावधी हा 2019 ते 2024 असा असल्याने हे संशोधन या कालावधीसाठी मर्यादित आहे

प्रकरण रचना

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने कृषी कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे कौटुंबिक विकासातील योगदान तसेच संशोधन विधान,संशोधनाचे महत्त्व, संशोधनाचे उद्देश, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची पद्धती, नमुना निवड, संशोधनाचा कालावधी, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा तसेच काही मूलभूत संकल्पनाची

मांडणी या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयासंबंधी विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, अहवाल तसेच काही संशोधकांनी या विषयासंबंधी केलेल्या पूर्व अभ्यासाचा, संशोधनाचा आढावा घेण्यात येणार आहे

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्ह्याचे सामाजिक-आर्थिक अवलोकन

जिल्ह्याचा भौगोलिक आणि आर्थिक माहिती, जिल्ह्याची सामाजिक रचना, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, महिला व श्रम सहभाग, शेतकरी व शेतमजूर महिलांची पारंपरिक स्थिती, क्षेत्रफळ सिंचन सुविधा, औद्योगिक माहिती, शैक्षणिक माहिती, वाहतूक व दळणवळण,राजकीय माहिती, हवामान व पर्जन्यमान पशुधन आरोग्य -वैद्यकीय माहिती, कृषी उत्पादनाचे स्वरूप आणि प्रमुख पिके, महिलांचा कृषी कामांमध्ये सहभाग आणि त्याचा दर्जा, कृषी क्षेत्रातील महिलासाठीच्या शासकीय योजना आणि विकास उपक्रमांचा जिल्ह्यातील प्रभाव या घटकाच्या साह्याने मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथी

कौटुंबिक जबाबदारी व महिला-विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणांमध्ये महिलांचे कुटुंबातील कार्य – घरगुती, आर्थिक, सामाजिक, कुटुंब निर्णय प्रक्रियेतील सहभाग, महिला व आर्थिक स्वावलंबन, आरोग्य, शिक्षण व मुलांच्या संगोपनातील भूमिका, समस्या व आव्हाने या घटका संबंधी मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

कौटुंबिक विकासातील योगदानाचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणांमध्ये कौटुंबिक जबाबदारी असलेल्या शेतकरी व शेतमजूर महिलांचे अनुभव, संकलित माहितीचे सांख्यिकीय व तुलनात्मक विश्लेषण, महिलांच्या योगदानाचे परिमाण व प्रभाव,कौटुबिक विकासात झालेला बदल या घटकाच्या अनुषंगाने सदरील प्रकरणांमध्ये मांडणी करण्यात येणार आहे

संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारसी

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संपूर्ण संशोधन कार्याचा सारांश, प्रमुख निष्कर्ष, शासकीय व सामाजिक संस्थांसाठी शिफारसी, भविष्यातील संशोधनासाठी सूचना या स्वरूपात मांडणी करण्यात येणार आहे.

संशोधनाची याप्रकारे एकूण सहा प्रकरणात मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भसूची

1. कुलकर्णी, एम. एस. (2010), ग्रामीण स्त्रियांचे श्रमजीवन व सामाजिक भूमिका, इंद्रप्रस्थ प्रकाशन, पुणे

2. बांदिवडेकर, वी. एस. (2012), भारतीय ग्रामीण महिला: कुटुंब, काम व जबाबदाऱ्या, मराठी

ग्रंथ संग्रहालय, मुबंई

3. देशपांडे, आर. एस. (2014), भारतातील महिला व ग्रामीण विकास, विश्वविद्यालय प्रकाशन.

4. कडू, एस. बी. (2015), ग्रामीण महिला: सामाजिक बांधिलकी आणि घरगुती जबाबदाऱ्या. नागपूर: जनविकास प्रकाशन, पुणे

5. भोसले, आर. एन. (2016). शेतमजूर महिलांचे अर्थकारण व कौटुंबिक जीवन, लोकविज्ञान संस्था, सोलापूर.

6. गायकवाड कविता, स्वयंपूर्णतेकडे वाटचाल: महिलांचा शेतकीतला प्रवास, सह्याद्री प्रकाशन, सातारा

7. शिंदे, बी. एन. (2018). कृषी व्यवस्थेतील स्त्रीशक्ती: समस्यांपासून समाधानाकडे, जनप्रकाशन, औरंगाबाद.

8. राजे, स्मिता (2019). कृषी आणि महिला: सामाजिक व आर्थिक मांडणी, यशोदा प्रकाशन, नाशिक.

9. कुंभार, माधवी (2021), शेतीतील स्त्रियांचे योगदान आणि त्याचे आर्थिक मोल, जागृती प्रकाशन, कोल्हापूर

10. भोसले, ए. व्ही. (2019).,कृषी अर्थशास्त्र आणि महिलांचा सहभाग: एक ग्रामीण दृष्टिकोन, सह्याद्री ग्रंथालय, औरंगाबाद

11. गवळी, रेखा (2020). ग्रामीण भागातील महिलांचे कृषी उत्पन्नातील योगदान: मराठवाडा विभागाचा अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

12. भुजबळ, एस. एम. (2021). कृषी व महिलांचे आंतरसंबंध: आर्थिक दृष्टिकोन, ग्रामविकास प्रकाशन, नाशिक

13. राज्य कृषी विभाग, महाराष्ट्र शासन (2022). शेती व महिलांचे आर्थिक सक्षमीकरण: योजनांचा आढावा अहवाल, मुंबई

14. संपादक: डॉ. शैलजा पाटील (2021). शेती, महिला आणि बदलते ग्रामीण जीवन, लोकमित्र प्रकाशन, पुणे

15. देवधर एस पी भारतीय कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था. पुणे: स्नेहल प्रकाशन

16. देशमुख, वी. आर. (2016). भारतातील महिला आणि कृषी. विदर्भ पब्लिकेशन्स, नागपूर

17. जोशी एस.एन (2020) औरंगाबाद जिल्ह्यातील महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान – एक अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संशोधन प्रबंध.

18. देसाई लता (2016) स्त्रियांचे आर्थिक योगदान आणि कृषी व्यवस्थेतील भूमिका. स्त्रीशक्ती मासिक, जुलै अंक, पृष्ठ १२–१५.

मार्गदर्शक

डॉ. व्ही. जी. कंधारे

(धुंडा महाराज महाविद्यालय, देगलूर)

संशोधक विद्यार्थी

कैलास मारोती वाघमारे